# आज आर्थिक विकास हा प्रामुख्याने देशातील कायद्याच्या चौकटीवर अवलंबून : अक्षत खेतान



पुणे : एयू कॉर्पोरेट अॅडव्हायजरी अँड लीगल सर्व्हिसेस (एयूसीएल) ही कॉर्पोरेट व्यूहरचना, आर्थिक सल्ला, कर्ज करार (डेट सिण्डिकेशन) आणि दावे-खटले लढवण्याच्या सेवा पुरवणारी आघाडीची मुंबईस्थित फर्म आहे.

एयूसीएल आपल्या क्लाएंट्सना व्यवहार्य व नवोन्मेषकारी उपाय सुचवून जटील आव्हानांमधून मार्ग काढण्यास मदत करते. त्यामुळेच सर्वसमावेशक सहाय्य हवे असलेल्या संस्थांसाठी ही फर्म विश्वासाचा सहयोगी आहे.

एयूसीएल सर्वांगीण दृष्टिकोनासाठी 360 डिग्री (सर्व बाजूंनी) विचारप्रक्रियेचा अवलंब करते. त्यामुळे ह्या सर्वांच्या पसंतीच्या विधीविषयक फर्मला विविध आव्हानांबाबत मूलभूत माहिती मिळवण्यात मदत होते. प्रत्येक आव्हानाकडे विविध दृष्टिकोनांतून बघितले जाऊ शकते आणि त्यासाठी खास तयार करण्यात आलेली अर्थात टेलर्ड व्यूहरचना आवश्यक असते, ह्यावर एयूसीएलचा ठाम विश्वास आहे. मूल्यनिर्मितीच्या कार्यात्मक नियमाचे पालन करून एयूसीएलने असंख्य क्लाएंट्सची कामे यशस्वीरित्या पार पाडण्यात मदत केली आहे.

अनन्यसाधारण सेवा : एयूसीएलने आपल्या अनन्यसाधारण सेवांच्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात स्वत: स्थान निर्माण केले आहे. ह्यात नियामक पूर्तता, धोरण विकास व अंमलबजावणी, कॉर्पोरेट प्रशासन, बौद्धिक संपदा हक्कांची नोंदणी, संरक्षण व प्रवर्तन तसेच समभाग भांडवल आणि अन्य वितरणांशी संबंधित प्रकरणांचा समावेश होतो.

एयू कॉर्पोरेट अँड लीगल अॅडव्हायजरी सर्व्हिसेस लिमिटेडचे (एयूसीएल) संस्थापक अक्षत खेतान ह्यांनी ह्यावेळी बोलताना उद्योगक्षेत्रातील व्यापक बदलांचे समर्थन केले. प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी स्पष्ट मार्ग आखून दिला जाण्याची गरज आहे ह्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर तरुण व्यावसायिकांमध्ये व्यावसायिक मानसिकतेला उत्तेजन देणे, डिजिटल स्पर्धेचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमांची चौकट प्रस्थापित करणे आणि राज्य स्तरांवरील कर मोडीत काढून इंधन व वीज हेदेखील वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) कक्षेत आणणे ह्या मुद्द्यांचेही त्यांनी समर्थन केले."

देशाची विधीविषयक चित्र बदलण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या खालील विषयांवर भर दिला पाहिजे असे श्री. अक्षत खेतान ह्यांना वाटते.

व्यवसायातील नीतीमत्तापूर्ण पद्धतींना कायदेशीर न्यायशास्त्राने भक्कम आधार दिल्याचे अनेक उदाहरणे आपल्या देशाच्या कॉर्पोरेट प्रवासाच्या इतिहासात दिसून येतात. राज्यघटना, वैधानिक नियम आणि सातत्याने उत्क्रांत होत राहणारा कायद्यांचा संग्रह ह्यांनी सुसज्ज असलेली आपली न्यायसंस्था, कॉर्पोरेट प्रशासन, स्पर्धा, कामगार संबंध, ग्राहक संरक्षण ह्यांतील जटील आव्हानांतून अविश्रांतपणे, मार्ग काढत आली आहे. त्याचबरोबर व्यवसायातील निष्ठा आणि सामाजिक जबाबदारी ह्या जेथे एकाच नाण्याच्या दोन बाजू समजल्या जातील असे वातावरणही न्यायसंस्थेने जोपासले आहे.

नादारी आणि दिवाळखोरी संहिता (इनसॉल्वन्सी अँड बँकरप्सी कोड अर्थात आयबीसी): आयबीसीमध्ये अनेक बदल करणे आवश्यक आहे. परदेशी गुंतवणूकदार व कर्जदात्यांना आवश्यक तो आत्मविश्वास पुरवण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे की नाही हे आता कायदे करणाऱ्यांनी ठरवायचे आहे. अखेरीस उद्दिष्ट तर व्यवसाय चालू ठेवणे आणि परदेशी गुंतवणुकीला आकर्षित करून घेणे हेच होते. आयबीसी सध्याच्या स्वरूपात देशांतर्गत व परदेशी गुंतवणूकदारांना फारसा आत्मविश्वास देण्यास सक्षम ठरलेली नाही. संसाधने असूनही कर्ज बुडवणारे (विलफुल डिफॉल्टर्स): आजच्या तारखेला आपल्या देशातील आघाडीचे 50 'विलफुल डिफॉल्टर्स' भारतीय बँकांना 9,2570 कोटी रुपये देणे लागतात, हे व्यवस्थित नोंदवलेले आहे. अर्थतज्ज्ञांद्वारे ह्या साधने असूनही कर्जाची परतफेड न करणाऱ्या कर्जदारांकडे फारसे लक्ष दिले न जाण्याचे एक कारण म्हणजे परतफेडीची क्षमता असूनही कर्ज बुडवणे हा प्रकार भारतासाठी तसा नवीन आहे. ह्याबाबत झालेले बहुतांश आर्थिक संशोधन हे अमेरिकाकेंद्री आहे. त्यामुळे अर्थशास्त्रात आणि वित्त उद्योगात 'विलफुल डिफॉल्ट' ह्या संकल्पनेकडे फारसे लक्ष दिले नाही ह्याबद्दल फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र ह्या महत्त्वपूर्ण आणि समर्पक आर्थिक समस्येवरील संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीचा अभाव हा भारतातील शिक्षणतज्ज्ञ व धोरणकर्त्यांसाठी चिंतेचा विषय असला पाहिजे.

# आर्थिक विकास कायद्याच्या चौकटीवर अवलंबून

एयू कॉर्पोरेट अ‍ॅडव्हायजरी अँड लीगल सर्व्हिसेस ही कॉर्पोरेट व्यूहरचना, आर्थिक सल्ला, कर्ज करार आणि दावे–खटले लढवण्याच्या सेवा पुरवणारी आघाडीची मुंबईस्थित फर्म आहे. एयूसीएल आपल्या क्लाएंट्सना व्यवहार्य व नवोन्मेषकारी उपाय सुचवून जटील आव्हानांमधून मार्ग काढण्यास मदत करते. त्यामुळेच सर्वसमावेशक सहाय्य हवे असलेल्या संस्थांसाठी ही फर्म विश्वासाचा सहयोगी आहे. एयूसीएल सर्वांगीण दृष्टिकोनासाठी सर्व बाजूंनी विचारप्रक्रियेचा अवलंब करते. त्यामुळे या सर्वांच्या पसंतीच्या विधीविषयक फर्मला विविध आव्हानांबाबत मूलभूत माहिती मिळवण्यात मदत होते. एयू कॉर्पोरेट अँड लीगल अ‍ॅडव्हायजरी सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान म्हणाले, प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी स्पष्ट मार्ग आखून दिला जाण्याची गरज आहे. तरुण व्यावसायिकांमध्ये व्यावसायिक मानसिकतेला उत्तेजन देणे, डिजिटल स्पर्धेचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमांची चौकट प्रस्थापित करणे आणि राज्य स्तरांवरील कर मोडीत काढून इंधन व वीज हेदेखील वस्तू व सेवा कराच्या कक्षेत आणणे महत्त्वाचे आहे.